# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

(नॅकद्वारे A+दर्जा)

विद्यार्थी विकास

संचालक (का.) : २४०३१३२
विद्यार्थी विकास : २४०३१३३
फॅक्स : (०२४०) २४०३१३४, २४०३१५०
तार : बामुसिटी
Web Site : www.bamu.ac.in
E-Mail : dsw@bamu.ac.in

डॉ. कैलास अंभुरे
संचालक,
विद्यार्थी विकास मंडळ
विद्यापीठ परिसर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००४
(महाराष्ट्र)
मो. क्र. : ७५८८१६५२२१


संदर्भ /संविवि/२०२५-२६/20306-20837 दिनांक : ०७.१०.२०२५

प्रति,
मा. प्राचार्य
सर्व संलग्नित महाविद्यालये,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर.

प्रति,
मा. विभाग प्रमुख
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर.

प्रति,
मा. संचालक
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ परिसर,
उपकेंद्र, धाराशिव.

विषय : औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघ मतदार नोंदणी कार्यक्रम-२०२५ बाबत...

संदर्भ : जा.क्र.२०२५/सा.प्र./निवडणूक/पदवीधर नि./कावि- दि. ३०.०९.२०२५ रोजीच्या पत्रानुसार...

महोदय/महोदया,

मतदार नोंदणी अधिकारी तथा विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्या पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, सोबत जोडण्यात आलेले परिपत्रक संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व पदवीधर विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

तसेच विद्यापीठ विभागातर्फे / महाविद्यालयातर्फे जास्तीत जास्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांना पदवीधर नोंदणी करण्यासाठी प्रेरित करावे, ही विनंती.

धन्यवाद,

सोबत : पत्र.

संचालक
विद्यार्थी विकास मंडळ

महाराष्ट्र शासन
विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर
(सामान्य प्रशासन शाखा)

दुरध्वनी क्र.- 0240-2339811
Email- dcg.aurangabad@gmail.com

पत्ता- दिल्ली गेट जवळ,
छ.संभाजीनगर ४३१००१

जा.क्र.२०२५/सा.प्र./निवडणूक/पदवीधर नि./कावि-

दिनांक : ३०.०९.२०

प्रति,

१. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
२. कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
३. कुलसचिव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी
४. कुलसचिव महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, कांचनवाडी, छत्रपती संभाजीनगर.
५. सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.
६. सहसंचालक, उच्च शिक्षण छत्रपती संभाजीनगर / नांदेड.
७. उपसंचालक, शिक्षण, विभागीय कार्यालय छत्रपती संभाजीनगर.
८. विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर.

महसुल सहाय्यक
विभागीय आयुक्त कार्यालय
छत्रपती संभाजीनगर

**विषय- ५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघ मतदार नोंदणी कार्यक्रम-२०२५**
मतदार नोंदणी कार्यक्रमास व्यापक प्रसिध्दी देणे व मतदार नोंदणीचे आवाहन करणेबाबत...

संदर्भ :- १) मा. भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र.३२२/LC/G&T/E-ROLL-BIEN, दि.१२.०९.२०२५
२) अपर सचिव व उप मुख्य निवडणूक अधिकारी, म.रा.यांचे पत्र क्र.ईएलआर-२०२५/प्र.क्र.८७/निवडणूक-६, दिनांक १२ सप्टेंबर, २०२५
३) मतदार नोंदणी बाबत प्रसिध्द सुचना दिनांक ३०.०९.२०२५

उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांनी दिनांक ०१/११/२०२५ या अर्हता दिनांक आधारीत औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूकीच्या अनुषंगाने मतदार नोंदणीचा कार्यक्रम घोषित केला आहे. प्रस्तुत कार्यक्रमाच्या अनुषंगाने दिनांक ३०/०९/२०२५ पासून पदवीधर मतदार नोंदणीची अर्हता धारण करीत असलेल्या व्यक्तींना विहित नमुना १८ मध्ये नाव नोंदणी करीता अर्ज करता येईल. अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक ०६/११/२०२५ असा आहे.

मतदार नोंदणीसाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक ३०.०९.२०२५ रोजीच्या सूचनेची प्रत यासोबत पाठविण्यात येत आहे. तरी सदर सुचना आपल्या अधिनस्त सर्व शैक्षणिक संस्था, महाविद्यालये, कार्यालये इत्यादींच्या निदर्शनास आणून द्यावे व पदवीधर मतदार नोंदणीच्या अनुषंगाने पात्र व्यक्तींना मतदार नोंदणी करण्याचे आवाहन करावे.

दिनांक ३०.०९.२०२५ रोजीच्या जाहीर सूचनेच्या परिच्छेद ३ मध्ये पात्र व्यक्तीच्या पदवीच्या कागदोपत्री पुराव्यासाठी सादर करावयाच्या कागदपत्रांबाबत नमूद आहे. त्यातील परिच्छेद क व ड नुसार विद्यापिठाने दिलेली नोंदणीकृत पदवीधर म्हणून नोंदणी पत्राची साक्षांकित प्रत, नोंदणीकृत पदवीधरांच्या यादीतील जसे की, अधिवक्त्यांची यादी, वैद्यकीय व्यावसायिकांची यादी, सनदी लेखापालांची नोंदवही, अभियंता संस्थेने ठेवलेली नोंदवही इ. मधील संबंधीत नोंदवहीची प्रमाणित प्रत किंवा दावा सांगणा-याचे

प्रतिज्ञापत्र व त्यापृष्ठ्यर्थ विद्यापीठाच्या कुलसचिवाचे किंवा कोणत्याही विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयाच्या प्राचार्याने किंवा तो ज्या महाविद्यालयात शिकत होता, त्या महाविद्यालयातील विभाग प्रमुखाने दिलेली प्रमाणपत्रे पदवीच्या पृष्ठ्यर्थ ग्राह्य धरण्यात येणार आहे. त्याबाबत आवश्यक कार्यवाही करुन पदवीधर मतदारांना सहकार्य करण्याच्या सूचना सर्व संबंधीतांना आपल्या स्तरावरून कळविण्यात यावे.

**सोबत- मतदार नोंदणी अधिनियम १९६० चे कलम ३१(३)**
**अन्वये प्रसिध्द केलेली सूचना**

**(जितेंद्र पापळकर, भा.प्र.से.)**
**मतदार नोंदणी अधिकारी**
**५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ तथा**
**विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर**

**प्रत-**

सर्व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.